RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक ६८(२)] शुक्रवार, ऑक्टोबर ११, २०२४/आश्विन १९, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

### लवाद यांचे कार्यालय

**नगररचना परियोजना नैना क्र. ८, नैना**

(आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत)

**जाहीर सूचना**

(महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र.१३ अन्वये)

क्रमांक लवाद /नरयो-८/ सर्वसाधारण/२०२४/०१

ज्याअर्थी, नैना प्रारूप नगररचना परियोजना क्र. ८ ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र. क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना क्र. सिडको/नैना/टीपीएस-८/२०२४/१०४, दिनांक ८ जुलै २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण भाग-२ मध्ये दिनांक ९ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्र. टीपीएस-१२२४ / १३४३ / प्र.क्र. ७८ / २४ / नरयो-८ / नवि -१२, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ अन्वये अधिनियमांच्या कलम ७२ पोट-कलम (१) प्रमाणे, उक्त मंजूर प्रारूप परियोजनेसाठी श्रीमती आशा शैलेश डहाके, निवृत्त सहायक संचालक नगररचना यांची लवाद म्हणून नेमणूक केली आहे.

म्हणून महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ प्रमाणे या सूचनेद्वारे मी निम्नस्वाक्षरीकार जाहीर करते की, नगररचना परियोजना नैना क्र. ८ (आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत) करीता लवाद म्हणून दिनांक ३ ऑक्टोबर२०२४ पासून कर्तव्ये पार पाडण्याचे काम सुरू केले आहे.

या नगररचना परियोजनेत समाविष्ट झालेल्या सर्व जमीनधारकांना उक्त मंजूर नगररचना परियोजनेच्या प्रस्तावासंबंधी सूचना किंवा हरकती सादर करण्यासाठी योग्य वेळी नमुना क्र. ४ मध्ये सूचना बजावण्यात येईल.

जे जमीनधारक किंवा परियोजनेत समाविष्ट झालेल्या जागांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्ती उक्त परियोजना तयार केल्यामुळे अपायकारकरित्या बाधित झालेले असतील त्यांना कळविणेत येते की, ते उक्त अधिनियमांच्या कलम १०२ प्रमाणे नुकसानभरपाई मिळण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचेसमोर ही जाहीर सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे मुदतीपर्यंत दावे सादर करणेस पात्र राहतील.

**आशा शैलेश डहाके,**
लवाद,
नगररचना परियोजना नैना क्र. ८.
(आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द
आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत).

दिनांक ३ ऑक्टोबर २०२४.

**पत्ता :** नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

# OFFICE OF THE ARBITRATOR

TOWN PLANNING SCHEME NO. 8, NAINA

(at part villages of Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje)

**Public Notice**

(Under Rule No.13 of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)

No. ARB/TPS-8/GEN/2024/01.

The NAINA Draft Town Planning Scheme No.8 (at part villages of Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje) has been sanctioned by the Vice Chairman and Managing Director, CIDCO under sub-section (*2*) of section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No. CIDCO/NAINA/TPS-08/2024/104, dated 8th July 2024, in exercise of the powers delegated to him by Urban Development Department *vide* Notification No.TPS-1817/973/C.R.103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification of draft sanction is published in *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part-II, dated 9th July 2024.

The Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No.TPS-1224/1343/CR-78/24/TPS-8/UD-12, dated 7th August 2024 under sub-section (*1*) of section 72 of the said Act, has appointed Smt. Asha Shailesh Dahake, Retired Assistant Director of Town Planning, as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme.

I, the undersigned therefore in accordance with Rule No.13 of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974, declare by this Notice that, I have commenced the duties as Arbitrator for NAINA Town Planning Scheme No.8 from 3rd October 2024.

All the owners of the lands included in this Town Planning Scheme will be served with special notice in Form No.4 to submit their suggestions or objections in respect of proposals of the sanctioned draft Town Planning Scheme in due course.

Those owners or interested persons of the lands included in the NAINA Town Planning Scheme No. 8, who have been injuriously affected by making of this scheme are hereby informed that they shall be entitled to make a claim of compensation as per section 102 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, before the undersigned within a period of 60 days from the date of appearing this Notice in the *Maharashtra Government Gazette*.

ASHA SHAILESH DAHAKE,
Arbitrator,
Town Planning Scheme No. 8, NAINA
(at part villages of Ambivali, Belavali, Chikhale,
Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani
Tarf Waje).

Dated : 3rd October 2024.

Place : NAINA Office, 7th Floor,

Tower No. 10, Belapur Railway Station Complex,

C.B.D. Belapur, Navi Mumbai 400 614.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.